**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदे मातरम्" या गीताच्या समूह गायनाने झाला.

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांचा परिचय व शपथविधी

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मुंबई विभाग पदवीधर मतदार संघातर्फे निर्वाचित डॉ. दीपक रामचंद्र सावंत यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

डॉ. दीपक रामचंद्र सावंत यांनी शपथ घेतली.

------

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मुंबई विभाग शिक्षक मतदार संघातर्फे निर्वाचित श्री. कपिल हरिश्चंद्र पाटील यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. कपिल हरिश्चंद्र पाटील यांनी शपथ घेतली.

-----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : सभापती महोदय, कोकण विभाग पदवीधर मतदार संघातर्फे निर्वाचित श्री.निरंजन वसंत डावखरे यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री.निरंजन वसंत डावखरे यांनी शपथ घेतली.

-----

श्री.अजित पवार : सभापती महोदय, नाशिक विभाग शिक्षक मतदार संघातर्फे निर्वाचित प्रा.डॉ.अपूर्व प्रशांत हिरे यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

डॉ.अपूर्व प्रशांत हिरे यांनी शपथ घेतली.

-----

. . . .बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : सभापती महोदय, परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्थाव्दारा निर्वाचित श्री.अब्दुल्ला खान अ.लतीफ खान दुर्राणी यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग संस्थाव्दारा निर्वाचित श्री.अनिल दत्तात्रय तटकरे यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्थेव्दारा निर्वाचित श्री.जयवंतराव पुंडलिकराव जाधव यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ......

सभापती महोदय, अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातर्फे निर्वाचित श्री. प्रवीण रामचंद्रजी पोटे यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातर्फे निर्वाचित श्री. मितेश गोटुलाल भांगडिया यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : आज माझ्याकडे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी दिलेली नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना आलेली आहे. मी ही सूचना आज चर्चेला न घेता उद्या घेण्याचे ठरविले आहे.

-----

**प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्याबाबत**

**सभापती** : आज माझ्या दालनामध्ये माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्याबरोबर जी चर्चा झाली त्यानुसार आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत शोक प्रस्तावाच्या अगोदर जी प्रश्नोत्तरे दाखविण्यात आलेली आहेत ती आज घेण्यात येणार नाहीत. आजचा प्रश्नोत्तराचा तास मी तहकूब करीत आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : आजची प्रश्नोत्तरे लॅप्स होणार नाहीत असे पहावे.

**सभापती** : आज प्रश्नोत्तरे घ्यावयाची नाहीत असे मी ठरविलेले आहे. त्यामुळे आजची प्रश्नोत्तरे लॅप्स झाली असा त्याचा अर्थ आहे. आजच्या प्रश्नोत्तरांची यादी उद्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल परंतु उद्या पुन्हा ही प्रश्नोत्तरे चर्चेला घेण्यात येणार नाहीत.

**सभागृहाच्या कामकाजाच्या क्रमाबाबत**

**सभापती** : आज शोक प्रस्तावानंतर अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे व इतर जे कामकाज दाखविण्यात आले आहे ते शोक प्रस्तावाच्या आधी घेण्यात येईल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2012 चा अध्यादेश क्रमांक 6 - मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा ) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन 2012 चा अध्यादेश क्रमांक 7 - महाराष्ट्र आकस्मिकता निधी (दुसरी सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन 2012 चा अध्यादेश क्रमांक 5 - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, 2012 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2012-2013 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012-2013 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203(3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2012-2013 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**सभापती** : सन 2012-2013 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे. सदरहू पूरक विवरणपत्राच्या प्रती सन्माननीय सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणाव्दारे वितरित करण्यात येत आहेत.

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : विधेयकांना संमती व अधिसंमती

**सभापती** : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपाल व राष्ट्रपती यांची अधिसंमती मिळाल्याची यादी सह सचिव वाचून दाखवतील.

सह सचिव : राष्ट्रपतींनी खालील विधेयकांना अधिसंमती दिली आहे :-

(1) सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 1 - नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा विधेयक, 2010

(2) सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 16 - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, 2011

राज्यपालांनी खालील विधेयकांना अधिसंमती दिली आहे :-

(1) सन 2011 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 11 - मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक, 2011

(2) सन 2012 चे विधानसभा विधेयक क्रमांक 4 - मुंबई वीज शुल्क (सुधारणा) विधेयक, 2012

(3) सन 2012 चे विधानसभा विधेयक क्रमांक 5- मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, 2012

(4) सन 2012 चे विधानसभा विधेयक क्रमांक 6 - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, 2012

(5) सन 2012 चे विधानसभा विधेयक क्रमांक 7 - महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, 2012

(6) सन 2012 चे विधानसभा विधेयक क्रमांक 17 - महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक 2012

(7) सन 2012 चे विधानसभा विधेयक क्रमांक 19 - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, 2012

---

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : सभापती तालिका नामनिर्देशित करणे

**सभापती** : मी महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 8(1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

(1) श्री. मोहन जोशी

(2) श्री. विनायक मेटे

(3) श्री. केशवराव मानकर

(4) श्री. परशुराम उपरकर

----

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव

**मु.शी.**: ॲड.प्रीतमकुमार संपतराव शेगांवकर,वि.प.स.तथा माजी मंत्री तसेच, सर्वश्री प्रकाश गणेश मोहाडीकर, लक्ष्मणराव शंकरराव देशमुख व माणिकराव शंकरराव मस्के, माजी वि.प.स.यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी ॲड.प्रीतमकुमार संपतराव शेगांवकर,वि.प.स.तथा माजी मंत्री तसेच, सर्वश्री प्रकाश गणेश मोहाडीकर, लक्ष्मणराव शंकरराव देशमुख व माणिकराव शंकरराव मस्के, माजी वि.प.स.यांच्या दु:खद निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"ॲड.प्रीतमकुमार संपतराव शेगांवकर,वि.प.स.तथा माजी मंत्री तसेच, सर्वश्री प्रकाश गणेश मोहाडीकर, लक्ष्मणराव शंकरराव देशमुख व माणिकराव शंकरराव मस्के, माजी वि.प.स.यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै. प्रितमकुमार संपतराव शेगांवकर, वि.प.स. व माजी मंत्री
यांचा अल्प परिचय

कै. प्रितमकुमार संपतराव शेगांवकर यांचा जन्म 10 मार्च 1937 रोजी बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.कॉम., एलएल.बी. पर्यंत झाले होते.

कै. शेगांवकर यांनी वकिली बरोबर जालना येथील परिवर्तन एज्युकेशन संस्थाचे उपाध्यक्ष, पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन, ट्रेड युनियनचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य रोजगार हमी योजना परिषदेचे सदस्य तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे संचालक म्हणुनही कार्य केले होते. त्यांचा अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी निकटचा संबंध होता.

कै. शेगांवकर हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निष्ठावंत सहकारी व रिपब्लिकन ऑफ इंडियाचे संस्थापक सदस्य, महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष व राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते.

कै. शेगांवकर हे दलितांच्या सामाजिक चळवळीचे नेते होते. त्यांनी दलित पँथर, कामगार चळवळ, मराठवाडा विद्यापीठ नामांतर, मराठवाडा रेल्वे रुंदीकरण, वैधानिक विकासमंडळ, औरंगाबाद येथे पोलिस आयुक्तालय व उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे यासाठीच्या आंदोलनांचे

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नेतृत्व केले होते. तसेच त्यांनी गायरान हक्क परिषद, मराठवाडा विकास परिषद, महिला विकास परिषदांचे आयोजन करुन समाज परिवर्तनाचे कार्य केले होते.

कै. शेगांवकर यांनी दक्षिण कोरिया, सिंगापूर व थायलंड येथील जागतिक धम्म परिषदेत सक्रीय सहभाग घेतला होता. आयुष्यभर त्यांनी दलित समाजाच्या विकासासाठी भरीव कार्य केले होते. भारतीय रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे ते निष्ठावंत कार्यकर्ते होते.

कै. शेगांवकर 2006 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा महाराष्ट्र परिषदेवर निर्वाचित झ ाले होते. त्यांनी राज्य मंत्रीमंडळात 2006-2009 या काळात गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधारणा, घर दुरुस्ती, पुनर्बांधणी, सामाजिक न्याय, खार जमीन व बंदरे या खात्यांचे राज्यमंत्री म्हणूनही कार्य केले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे गुरुवार दिनांक 21 जून 2012 रोजी दुःखद निधन झाले.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, कै.प्रकाश गणेश मोहाडीकर यांचा जन्म 9 जानेवारी, 1919 रोजी जळगांव जिल्ह्यातील अमळनेर येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.(ऑनर्स), बी.एड. पर्यंत झाले होते.

कै. मोहाडीकर यांनी स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय सहभाग घेतला होता. त्यात त्यांना कारावासही झाला होता. गांधीवादी विचारसरणीचे मोहाडीकर हे सानेगुरुजींचे अनुयायी होते. त्यांनी सानेगुरुजींच्या विचारांचा आयुष्यभर प्रसार केला.

कै. मोहाडीकर यांनी कष्टकरी व गोरगरीबांच्या मुलांना शिक्षण मिळावे यासाठी दादरमध्ये सानेगुरूजी विद्यालय सुरु केले. सानेगुरुजी कथामाला तसेच "मुलांचा शाम" या पाक्षिकाद्वारे व "बालविकास" या मासिकाच्या माध्यमातून सानेगुरूजींचे विचार व संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर रुजविण्याचे काम त्यांनी केले होते. त्यांचा अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी निकटचा संबंध होता.

कै. मोहाडीकर यांनी दादर येथील अमरहिंद मंडळाचे संस्थापक, पनवेल येथील शांतीवन या कुष्ठरोग निवारण संस्थेचे संस्थापक-कार्याध्यक्ष तसेच गीता प्रतिष्ठान या संस्थेच्या महाराष्ट्र शाखेचे कार्यवाह म्हणूनही कार्य केले होते. त्यांनी जातीय सलोखा राहावा यासाठी शांतता अभियान, आपदग्रस्त व दुष्काळग्रस्तांना मदत कार्य, ज्ञानमंदीर, गणेश वाचनालय, संत सप्ताह, गरिब रुग्णांना मदत यासारखी अनेक समाजपयोगी कामे केली होती. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याबद्दल त्यांना सानेगुरुजी बालसेवा पुरस्कार, आदर्श समाजसेवक पुरस्कार, समाज भूषण पुरस्कार, सर्वपल्ली राधाकृष्णन पुरस्कार, सानेगुरुजी जीवन निष्ठा पुरस्कार, यासारख्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले होते.

कै.मोहाडीकर यांनी मुंबई महानगरपालिकेचे सदस्य तसेच शिक्षण समितीचे अध्यक्षपदही भूषविले होते.

कै. मोहाडीकर 1967 मध्ये मुंबई विभाग शिक्षक मतदार संघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार दिनांक 19 मे, 2012 रोजी दु:खद निधन झाले.

-----

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कै. लक्ष्मणराव शंकरराव देशमुख यांचा जन्म 2 मार्च 1926 रोजी बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे झाला. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले होते.

कै. देशमुख यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामात सक्रिय सहभाग घेतला होता.

कै. देशमुख यांनी परळी येथील श्री वैजनाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन तसेच बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते. ते काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. त्यांचा अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी निकटचा संबंध होता.

कै. देशमुख यांनी परळी वैजनाथ नगरपालिकेचे नगराध्यक्ष, बीड जिल्हा परिषदेचे सदस्य तसेच अर्थ व आरोग्य समितीचे सभापती म्हणूनही कार्य केले होते.

कै. देशमुख 1968 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा तसेच 1976 मध्ये बीड-उस्मानाबाद स्थानिक प्राधिकारी संस्थाद्वारा असे दोन वेळा महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे सोमवार दिनांक 19 डिसेंबर 2011 रोजी दु:खद निधन झाले.

कै. माणिकराव शंकरराव मस्के यांचा जन्म 12 एप्रिल 1922 रोजी परभणी जिल्ह्यातील नवामोंढा येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए., बी.एड. पर्यंत झाले होते.

कै. मस्के यांनी परभणी जिल्हा सहकारी बँकेचे संचालक, जिल्हा खरेदी-विक्री संघाचे चेअरमन तसेच परभणी जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणूनही काम केले होते. त्यांचा अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी निकटचा संबंध होता.

कै. मस्के 1970 मध्ये परभणी-नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्थांद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे बुधवार, दिनांक20 जून 2012 रोजी दु:खद निधन झाले.

या चारही माजी सन्माननीय सदस्यांना मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

--

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

कै. प्रीतमकुमार संपतराव शेगावकर हे आपल्या विधानपरिषदेचे विद्यमान सदस्य होते. मागील बाकावर बसून सभागृहातील कामकाजामध्ये ते घेत असलेला सहभाग आपण गेल्या काही वर्षापासून पहात होतो. भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षांची महायुती झाल्यानंतर कै. प्रीतमकुमार शेगांवकर यांच्याकडून त्यांचे आंबेडकरी चळवळीतील काम ऐकण्याची संधी आम्हाला वारंवार प्राप्त झाली. कै. प्रीतमकुमार शेगांवकर यांनी पूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दीक्षांत भूमीवरील कार्यक्रमात धर्मांतर केले आणि तेव्हा पासून त्यांनी सामाजिक कार्याला वाहून घेतले. घरची परिस्थिती लक्षात घेता त्यांनी 1961ते 1972 या कालावधीत शासकीय नोकरी केली. त्यानंतर दलित पँथरच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक चळवळीमध्ये अधिक आक्रमकपणे काम केले. मराठवाडा विद्यापीठ नामांतर, मंडल आयोग, गायरान जमिनी संबंधीचा लढा यामध्ये ते अग्रभागी राहिले. दलित, आदिवासी, भूमिहीन शेतकरी, कष्टकरी यांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी ते सतत झटले. त्यांनी संविधान संदेश यात्रा देखील काढली होती. डॉ. बाबासाहेबांचे विचार नजरेसमोर ठेवून समाजासाठी ते अविरत कार्यरत राहिले.

दुष्काळाच्या वेळी संभाजीनगरमध्ये आलेल्या सर्व दुष्काळग्रस्तांसाठी आश्रयस्थान निर्माण करणे, त्यांना निवारा देणे, त्यांच्यासाठी रोजगार पाहणे इत्यादी कामामध्ये ते सातत्याने अग्रभागी राहिले. मी त्यांना या सभागृहामध्ये गृहनिर्माण राज्यमंत्री म्हणून काम करताना पाहिले. गृहनिर्माण विभागाच्या माध्यमातून सामान्य माणसाला कसा निवारा देता येईल, सामान्य माणसांना म्हाडाच्या माध्यमातून कशी कामे देता येतील यादृष्टीने ते सतत प्रयत्नशील असायचे. अनेक वेळा आम्ही प्रश्न विचारल्यानंतर तो जर तत्काळ सोडविता येत नसला तर नंतर आम्हाला भेटून तो प्रश्न मी सोडवीन असे ते मोकळेपणे आम्हाला सांगत . इतकेच नव्हे तर ते आम्हाला चिठ्ठी पाठवून आवर्जून बोलावून घेऊन सांगायचे की, तुमचा प्रश्न मार्गी लावण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. दुर्दैवाने त्यांचे निधन झाल्यामुळे या अधिवेशनात त्यांचा सहभाग आपण पाहू शकत नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम 11:25

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, कै.प्रकाश गणेश मोहाडीकर यांचे नाव संपूर्ण महाराष्ट्राला सुपरिचित होते. प्रकाश मोहाडीकर म्हणून त्यांना सर्व लोक ओळखत होते. परंतु त्यांचे मूळ नाव लक्ष्मण असे होते. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी उल्लेख केला की, नाशिक शहरात इंग्रजांच्या विरोधात जाऊन स्वातंत्र्य लढयात ते सक्रिय सहभागी झाले. स्वातंत्र्य लढयात त्यांनी प्रकाश शहा नाव धारण केले. त्या नावाने ते प्रसिध्द झाले. राज्यातील लोक त्यांना प्रकाश मोहाडीकर न समजता प्रकाश शहा म्हणून ओळखू लागले. एवढा त्यांचा स्वातंत्र्य लढयात सहभाग होता. त्यांनी साने गुरुजींच्या विचाराच्या आधारे वेगवेगळी कामे सुरु केली. त्यांनी वेगवेगळी कार्ये हाती घेतली. त्यात लहान लहान मुलांच्या मनावर अधिकाधिक चांगले संस्कार कसे होतील या कार्यावर त्यांचा जास्त भर होता आणि विशेषत: ज्या समाजाला सहजपणे शिक्षण घेणे शक्य नव्हते अशा कुटुंबातील मुले आणि मुली यांच्यासाठी काही वेगळे प्रयत्न साने गुरुजी विद्यालयाच्या माध्यमातून केले. तसेच त्यांनी अनेक लोकांसाठी वेगवेगळया ॲक्टीव्हीटीज उपलब्ध दिल्या.

सन्माननीय श्री. भरतकुमार राऊत, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे हे त्या शाळेतील विद्यार्थी आहेत. अनेक गोष्टी, घडामोडी होत असतात त्या सर्व जुन्या गोष्टी, घडामोडी प्रकाश शहा यांच्या स्मरणात राहत होत्या. हजारो विद्यार्थ्यांची नावे त्यांच्या लक्षात राहत असत. वर्गातील एखादा विद्यार्थी चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाला, पुढे जाऊन तो डॉक्टर झाला, इंजिनिअर झाला अशा विद्यार्थ्याचे नाव लक्षात राहणे हे स्वाभाविक असते. एखादा सामान्य विद्यार्थी लिपीक म्हणून एखाद्या कार्यालयात सेवा करीत असेल व तो दादरच्या रस्त्यावर भेटला तर त्याला ते नावानिशी बोलवून त्यांच्याशी बोलत असत. या गोष्टींना स्मरणशक्ती म्हणता येणार नाही, त्या विद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये त्यांची मोठी इन्व्हॉल्व्हमेंट होती. ते विद्यार्थ्यांमध्ये पूर्णपणे इन्व्हॉल्व्ह होत होते, त्यामुळे त्यांच्या स्मरणात विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती राहत होती. या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांना माहिती नसेल की, प्रकाश शहा हे उत्तम खो-खो पटू होते. शाळेतील विद्यार्थी खो-खो खेळत असत त्यावेळी ते त्या मुलांमध्ये आवर्जून सहभागी होत असत.

2....

09-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F-2

श्री. विनोद तावडे....

सभापती महोदय, प्रकाश शहा हे वेळेच्या बाबतीत अतिशय सजग होते. त्यांच्या साने गुरुजी विद्यालयात माननीय यशवंतराव चव्हाण यांचा एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. परंतु माननीय यशवंतराव चव्हाण यांना त्या कार्यक्रमास येण्यास उशीर झाला. यशवंतराव चव्हाण यांची वाट न पाहता त्यांनी कार्यक्रम वेळेवर सुरु केला. त्यांनी ठरलेल्या कार्यक्रमासाठी वेळेचे बंधन पाळले म्हणून माननीय यशवंतराव चव्हाण यांनी त्यांचे कौतुक केले. ठरलेले काम ठरलेल्या वेळेत पूर्ण करणे या गोष्टीवर त्यांचा जास्त प्रमाणात भर असे. विद्यार्थ्यांच्या यांच्या मनावर चांगले संस्कार होण्यासाठी केवळ भाषण न करता प्रत्येक विद्यार्थ्यांला रोज देण्यात येणाऱ्या खाऊतील दररोज 1 रुपया वाचविण्यास ते सांगत असत, सर्व विद्यार्थ्यांचे 365 दिवसांचे पैसे जमा करुन ते पैसे माटुंगा येथील महिलाश्रमात विद्यार्थ्यांच्या वतीने देणगी म्हणून देत होते. या गोष्टी ते भाषणातून करीत नव्हते तर कृतीतून करुन दाखवित होते. अनेक महान व्यक्तींनी आपले आदर्श जीवन कृतीतून दाखविले, त्यांच्या आदर्श जीवनाचा आधार घेऊन अनेक लोक आपल्या जीवनात उभे राहिले. आताच्या सामाजिक, राजकीय, व्यवसायिक जीवनामध्ये असे आदर्श कमी होत चालले आहेत. आदर्श विचारांच्या आधारावर समाजासाठी ते लढले. प्रत्येक सामान्य कुटुंबातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे, दिवसा काम करा परंतु रात्री शिक्षण घ्या याबाबतीत राज्यातील जनतेमध्ये जागृती निर्माण करण्याचे काम देखील त्यांनी केले. अशा अनेक वेगवेगळया योजना त्यांनी सुरु केल्या. मुंबई शहरात गणोशोत्सव प्रसिध्द आहे, त्यामुळे त्यांनी शारदोत्सव सुरु केला. सर्व समाजातील मुला, मुलींना संधी मिळाली पाहिजे म्हणून त्यांनी अनेक उपक्रम सुरु केले आहेत. प्रकाश शहा यांच्या शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती शरयू ठाकूर होत्या, श्री. सुधीरभाऊ जोशी हे सुध्दा अध्यक्ष होते. त्यांच्या वेगवेगळया संस्थेच्या कामासाठी सर्व पक्षाची मंडळी सक्रिय असत, असे एक आदर्श व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेले आहे.

यानंतर श्री. कानडे...

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

सभापती महोदय, श्री. लक्ष्मणराव शंकरराव देशमुख हे दोन वेळा या सभागृहाचे सदस्य म्हणून निवडून आले होते. परळी नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून सर्वांच्या ते परिचयाचे होते. राजकीय, सामाजिक आणि विशेषत: धार्मिक क्षेत्रात त्यांनी भरीव असे योगदान दिलेले आपण सर्वांनी पाहिले आहे. परळी-वैजनाथ देवस्थानचे सचिव म्हणून आणि मराठवाडा मुक्ती स्वातंत्र्य संग्रामामध्ये त्यांनी काम केले होते. तसेच मराठवाडयाच्या विकास कामांमध्ये देखील त्यांचा मोठा वाटा होता.

सभापती महोदय, श्री. माणिकराव शंकरराव मस्के हे सुध्दा या सदनाचे सदस्य होते. त्यांचे हैद्राबाद येथे शिक्षण झाले होते. त्यांनी शिक्षण खात्यामध्ये नोकरी केली. त्याचप्रमाणे सहकार क्षेत्रामध्ये देखील त्यांनी भरीव काम केले होते. प्रतिकूल राजकीय परिस्थितीमध्ये सुध्दा सातत्याने ते पक्षाचे काम करीत होते आणि या सदनामध्ये निवडून आले होते.

या सदनाचे माजी सदस्य श्री. प्रीतमकुमार शेगांवकर, श्री. प्रकाश गणेश मोहाडीकर, श्री. लक्ष्मणराव शंकरराव देशमुख आणि श्री. माणिकराव शंकरराव मस्के या महान व्यक्तिंच्या दु:खद निधनाबद्दल मी विरोधी पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : माननीय सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित दादा पवार यांनी जो शोक प्रस्ताव सदनासमोर मांडला आहे त्यासंदर्भात माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. श्री.प्रीतमकुमार शेगांवकर आज सदनामध्ये आमच्यासमोर बसलेले नाहीत. श्री. शेगांवकर हे अत्यंत मृदुभाषी आणि शांतस्वभावाचे होते. मंत्री म्हणून त्यांचे काम आम्ही सदनामध्ये पाहिले आहे. श्री. रामदास आठवले यांनी त्यांना मंत्रिपदाचा बहुमान मिळवून दिला होता. श्री. शेगांवकर यांनी आपले मंत्रिपदाचे कामकाज अतिशय संयमाने आणि शांतपणाने पार पाडले. मंत्री म्हणून काम केल्यानंतर ते सदस्य म्हणून देखील या सदनात काम करीत होते.

श्री. शेगांवकर हे चिडू शकतात असे कधीच वाटले नाही. मागील अधिवेशनामध्ये दलितांच्या प्रश्नासंबंधी एक विषय आला होता त्यावेळी श्री.शेगांवकर हे चिडले होते. ते इतके चिडले की, सदनातून ताड् ताड् निघून गेले. परंतु त्यांच्या चिडण्यामागे आतला उमाळा जाणवत होता. गत अधिवेशनातच श्री. शेगांवकर यांनी मला एक पत्र पाठविले होते. या सदनाचे सदस्य श्री. राम पंडागळे यांच्या निलंबनाबाबत त्यांनी मला पत्र लिहिले होते. श्री. रामदास कदम व अन्य अनेक सन्माननीय सदस्यांना देखील त्यांनी पत्र लिहिले होते. श्री. राम पंडागळे यांचे निलंबन पूर्ण अधिवेशनाकरिता केले होते ते मागे घ्यावे याबाबत त्यांनी पत्र लिहिले होते. श्री. पंडागळे यांचे निलंबन करुन 4-5 दिवस झाले होते. वास्तविक श्री. राम पंडागळे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य आहेत. परंतु दलित समाजाच्या आमदाराचे निलंबन झाले आहे. दलित समाजाचा आमदार सदनाच्या बाहेर आहे त्याला परत सदनात घेणे याविषयी त्यांना असलेली तळमळ त्यावेळी दिसून आली. श्री. पंडागळे यांचे निलंबन रद्द करा शिक्षा जास्त होत आहे ही त्यांची त्यामागची भावना होती. श्री. राम पंडागळे यांचा राग देखील कोणत्या एका व्यक्तिबद्दल नव्हता तर दलित समाजाविषयी त्यांची ती तळमळ होती. दलित समाजावर होत असलेल्या अन्यायाबाबत त्यांनी मत व्यक्त केले होते.

श्री. शेगांवकर हे मराठवाडयाचे होते. मी देखील मराठवाडयात 17-18 वर्षे काम केले आहे. श्री.शेगांवकर यांनी देखील मराठवाडयात काम केले होते. एवढेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी काम केले होते. श्री. शेगांवकर हे शिक्षित होते. शिक्षकी पेशातील होते. ते नेहमी टाय आणि कोट अशा ड्रेसमध्ये वावरत होते. मी त्यांना गंमतीने विचारीत असे की, तुम्ही झोपताना देखील टाय आणि कोट घालता काय ?

......3



SSK/ D/ KTG/ 11:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

मराठवाडयाच्या सर्व भागामध्ये त्यांनी अग्रक्रमाने काम केले आहे. रिपब्लिकन चळवळ उभी राहिली त्याचे मोठे श्रेय श्री. रामदास आठवले आणि श्री. प्रीतमकुमार शेगांवकर यांना दिले जाते.मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराची चळवळ उभी राहिली होती. त्यावेळी श्री. शेगांवकर यांनी काम केले. आता विद्यापीठाने एक परिपत्रक काढले आहे की, विद्यापीठाच्या आवारामध्ये कोणीही आंदोलन करावयाचे नाही. संपूर्ण क्षेत्रामध्ये विद्यार्थी आंदोलनाला त्यांनी सक्रिय पाठिंबा दिला होता. त्यांना न्याय देण्याकरिता ते नेहमी काम करीत होते.

आम्ही त्यांच्याकडे चहा पिण्यासाठी जात होतो. ते अतिशय मितभाषी होते. श्री.शेगांवकर सदनामध्ये अत्यंत संयमाने प्रश्नांची उत्तरे देत असत. मंत्र्यांची उत्तरे ऐकल्यानंतर श्री. शेगांवकर यांची उत्तरे देण्याची पध्दत व इतर मंत्र्यांची उत्तरे देण्याची पध्दत यातील फरक जाणवतो.

यानंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ D/पूर्वी श्री.कानडे 11:35

श्री.दिवाकर रावते............

संयमाने, कणखरपणाने आणि व्यवस्थितपणे आपण खात्याचा कारभार करीत आहोत हे त्यांनी त्यांच्या कामकाजातून आपल्याला दाखवून दिले. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांना आदरांजली वाहतो.

सभापती महोदय, आमच्या दादर विभागातील सर्वच लहान मुलांचे भूषण असलेले आमचे आवडते प्रकाशभाई मोहाडीकर सर आमच्यातून निघून गेलेले आहेत. आमच्या लहानपणी देखील आम्ही त्यांना ओळखत होतो. आजची त्या भागातील पाचवी पिढी असेल, जी प्रकाशभाई मोहाडीकरांना "सर" म्हणून ओळखते, इतके त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्व होते. शिक्षक कसा असावा हे शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करणारे माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी ध्यानात घ्यावे अशी माझी त्यांना प्रेमळ सूचना आहे.

मोहाडीकर सर हे या सभागृहाचे सदस्य होते. महिन्यातून एक वेळा जरी भेटलो नाही तरी मला ते दूरध्वनी करायचे. मला ते नेहमी आडनावाचा उल्लेख न करता 'दिवाकरजी' या नावाने संबोधायचे. दूरध्वनी करुन भेटायला का आला नाहीत याबद्दल विचारपूस करायचे. त्यांना विशिष्ट प्रकारचा आवाज लाभला होता. कापऱ्या स्वरुपाचा त्यांचा आवाज होता. असा अवाज कानी पडला की तो आवाज मोहाडीकर सरांचाच आहे हे लक्षात येत असे.

सभापती महोदय, शाळेमध्ये सर्व मुलांना कडवटपणा न येता शिस्त लावायची हे त्यांचे वैशिष्ट्य होते. साने गुरुजी कथामालेसाठी आयुष्य वाहून घेतलेले ते दुसरे साने गुरुजी होते. त्यांनी आयुष्यभर ते व्रत स्वीकारले होते. ज्या भागातून ते नगरसेवक म्हणून निवडून आले होते त्याच भागातून मी मुंबई महानगरपालिकेवर नगरसेवक म्हणून निवडून आलो. ते स्वत: मला येऊन भेटले. एखाद्या व्यक्तीला कामाची आस कशी असते याचा आदर्श मोहाडीकर सरांनी आमच्यापुढे ठेवला. नगरसेवक पदाच्या कारकीर्दीत मला जे जमले नाही ते काम आपण केले तर बरे होईल असे ते मला म्हणाले. एवढे मोठे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

सभापती महोदय, प्रभादेवी येथील इंदू मिलच्या पुढे जो चौक आहे त्याचे 'सोमवंशी क्षत्रीय पाठारे चौक' असे नामकरण झालेले आहे. त्या चौकामध्ये वाहतूक सिग्नल बसविण्याचा त्यांनी अनेकदा प्रयत्न करुनही त्यात त्यांना यश आलेले नव्हते. त्या चौकामध्ये वारंवार अपघात होतात. त्यामुळे त्या चौकात वाहतूक सिग्नल बसविण्याचे काम मी तडीस न्यावे अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

केली होती. मी प्रथमच नगरसेवक म्हणून निवडून आलो होतो. वाहतूक सिग्नल बसविण्याचे काम राज्य शासनाचे आहे अशी माझी समजूत होती. मी नगरसेवक पदाच्या दुसऱ्या वर्षी स्थायी समितीवर सदस्य म्हणून नियुक्त झाल्यानंतर मला कळले की, वाहतूक सिग्नलच्या कामाला महापालिकेच्या माध्यमातून मंजुरी दिली जाते. अशा वाहतूक सिग्नलच्या ठिकाणी झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे रंगविण्याचे काम देखील महापालिकेच्या माध्यमातून केले जाते. फक्त वाहतूक पोलीस विभागामार्फत सिग्नलचे नियंत्रण केले जाते. स्थायी समितीच्या माध्यमातून मी तत्कालीन महापालिका आयुक्तांना माझ्या दालनात बोलावून घेतले व वाहतूक सिग्नल मंजूर करण्यामध्ये काही अर्थकारण आहे काय, सोमवंशी क्षत्रीय पाठारे चौकात वाहतूक सिग्नल का मंजूर होत नाही याची विचारणा केली. आयुक्तांनी काहीही अर्थकारण नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्या चौकात वाहतूक सिग्नल मंजूर करण्यात आला. अद्यापही त्या चौकात वाहतूक सिग्नल कार्यरत आहे. त्या रस्त्यावरुन प्रवास करीत असताना आजही प्रकाशभाई मोहाडीकर यांची आठवण आल्याशिवाय रहात नाही.

सभापती महोदय, साने गुरुजी विद्यालयाची इमारत ज्या ठिकाणी आहे त्या जागेवर पूर्वी भाजीचा मळा होता. तो भूखंड शाळेसाठी राखीव होता. श्री.मनोहर जोशी हे मुंबई महापालिकेचे नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर त्यांनी तो भूखंड शाळेसाठी राखीव ठेवण्याचा प्रयत्न केला होता. परंतु तेथील काही विघ्नसंतोषी लोक त्या जागेवर शाळा होऊ देत नव्हते. शेवटी त्या भूखंडाचा निम्मा भाग शाळेसाठी मंजूर करण्यात आला आणि त्या जागेवर साने गुरुजी विद्यालयाची बैठी इमारत उभी राहिली.

सभापती महोदय, ती शाळा त्या जागेवर दहा-बारा वर्षे सुरु होती. त्या शाळेची पुनर्बांधणी करण्यासाठी बीओटी तत्वावरील संकल्पनेचे प्रवर्तक म्हणून मोहाडीकर सर यांचेच नाव घ्यावे लागेल. शाळेची अनेक मजली इमारत उभी राहण्यासाठी सर घरोघरी फिरले आणि देणग्या गोळा केल्या. शाळेसाठी देणगी म्हणून कोणी 100 रुपये दिले, कोणी 50 रुपये दिले, कोणी 5 रुपये दिले तरी ते आनंदाने स्वीकारायचे. त्यासाठी ते स्वत: झोळी घेऊन निघायचे आणि संस्थेसाठी निधी गोळा करायचे. शाळेची मोठी इमारत उभी रहावी यासाठी त्यांनी बीओटी तत्वावरील प्रकल्प

..3..



SGB/ KTG/ D/पूर्वी श्री.कानडे 11:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

राबविला. त्या माध्यमातून आज त्या जागेवर एका बाजूला कोहिनूर हॉटेल मॅनेजमेंट संस्थेची इमारत आणि दुसऱ्या बाजूला साने गुरुजी विद्यालयाची इमारत आणि मॅरेज हॉल उभारण्यात आला आहे.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

तो बीओटीचा पहिला प्रकल्प त्यांनी दादरमध्ये राबविला.

त्यानंतर मुंबईचा महापौर झाल्यानंतर ते पुन्हा मला येऊन भेटले. तेव्हा त्यांनी खंत व्यक्त केली व सांगितले की, मी वर्षानुवर्षे प्रयत्न करीत आहे, वारंवार महापालिकेशी झगडतो तरी देखील माझे काम होत नाही, ते काम आपण करावे. मी त्यांना कोणते काम आहे असे विचारले असता ते म्हणाले की, स्मशानभूमीच्या संदर्भातील काम वारंवार प्रयत्न करुनही होत नाही. साने गुरुजींचे ज्या स्मशानभूमीत दहन झाले त्याच तारखेला तात्या बापट यांचेही तेथेच दहन झाले आहे. राज्यातील या दोन्ही विभूतींचे जेथे दहन झाले तेथेच त्यांचे स्मारक व्हावे, अशी माझी इच्छा आहे. यासाठी मी गेल्या पाच-सात वर्षापपासून सतत प्रयत्न करीत आहे, पण मला प्रतिसाद मिळत नाही, पण माझी तळमळ आहे की, याच जागेवर त्यांचे स्मारक व्हावे. त्यावेळेस मी त्यांना उत्साहाच्या भरात बोलून गेलो की, आपण म्हणता त्याप्रमाणे साने गुरुजी व तात्या बापट यांचे स्मारक त्याच जागेवर येत्या दीड महिन्यात होईल. मला सांगण्यास आनंद वाटतो की, त्यावेळी महापालिकेत हे प्रकरण अत्यंत व्यवस्थित मांडले गेले आणि खऱ्या अर्थाने दीडच महिन्यात हे स्मारक झाले. आजही साने गुरुजी आणि तात्या बापट यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी प्रत्येक वर्षी ज्यांची ज्यांची या कामी मदत झाली त्या सर्वांना सर बोलवित होते. त्या दिवशी एक कार्यक्रम आयोजित करण्यात येत होता, अशा प्रकारे पाठपुरावा करुन त्यांनी हे स्मारक करुन घेतले. स्मारक मंजूर झाले तेव्हा आम्हाला वाटले होते की, येथे फक्त या दोघांचेच स्मारक राहील. पण आता मात्र खेद एकाच गोष्टीचा वाटतो की, या स्मारकाच्या विस्तारीकरणाचा प्रकल्प राबवून त्यात आणखी काही नावे लावण्यात आली. पण या दोन विभूतींएवढे किंवा ज्यांचे नाव त्या स्मारकांच्या ठिकाणी लावावे असे दुसरे कोणी असेल असे मला वाटत नाही, पण इतरांची नावे तेथे लावलीत, हे मात्र खरे आहे.

महोदय, दादरला "अमरहिंद" नावाचे सांस्कृतिक मंडळ आहे. या मंडळाच्या वतीने दरवर्षी दहा दिवसांचा वक्तृत्वाचा कार्यक्रम घेण्यात येतो. राज्यातील अनेक उच्च विद्याविभूषित वक्ते तसेच यशवंतराव चव्हाणांपासून अनेक वक्ते या दहा दिवसांमध्ये येऊन गेले आहेत. हे दहा दिवस दादरकरांसाठी एक पर्वणीच असते. या काळात दादरमधील प्रत्येक व्यक्तिला वाटते की, आपण किमान एक दिवस तरी या कार्यक्रमासाठी जावे. त्या काळात माननीय शिवसेना प्रमुखांचे

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...........

वक्तृत्व सुध्दा झाले होते.  दत्ताजी साळवी यांचे वक्तृत्व झाले, असे सर्व प्रसंग या निमित्ताने डोळ्यासमोर येऊन जातात.  मला वाटते आपल्या सभागृहाचे माजी सभापती प्रा. ना.स.फरांदे यांचेही व्याख्यान मी तेथेच ऐकले आहे.  अशा प्रकारे राज्याला एक सांस्कृतिक चेहरा देण्याचे काम सरांनी केले आहे.

मागील वर्षी मोहाडीकर सरांनी मला एका कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बोलावले होते.  आताच माननीय विरोधी पक्षनेते बोलले त्याप्रमाणे गरिबांसाठी, कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी शाळा चालविण्याचा सरांचा आग्रह होता.  त्याच अनुषंगाने कार्यक्रम पार पडल्यानंतर त्यांनी त्यांचेच एक विद्यार्थी ॲड. भावे, जे सध्या फार मोठे व निष्णात वकील आहेत, त्यांना विनंती करुन सांगितले की, एका मुलाच्या शिक्षणासाठी वर्षाला 2500 रुपये खर्च येतो.  अशा 100 गरीब मुलांना शाळेच्या वतीने जेवण देण्याची माझी इच्छा आहे.  त्या 100 विद्यार्थ्यांचे पैसे तू उपलब्ध करुन दिले तर हे गरीब विद्यार्थी या शाळेत जेवतील, अशी ती संकल्पना होती.  हे ऐकून मला धक्काच बसला आणि असे वाटले की, एवढ्या समर्पित भावनेने गरिबांसाठी शाळा चालविणारी ही व्यक्ती शासनाकडून एक रुपयाचेही अनुदान मागत नाही.  उलट इकडून तिकडून मदत जमा करुन गरीब मुलांना एक वेळचे जेवण आणि शिक्षण देण्याचे, असे एक आगळेवेगळे काम सरांनी केलेले आहे.  त्यांनी मला सांगितले होते की, माझ्या मृत्यूनंतर श्रध्दांजली वाहण्यासाठी सभा घेऊ नये.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

कै. मोहाडीकरांनी माझ्या मृत्यूनंतर श्रध्दांजलीची सभा घेऊ नये असे आवर्जून लिहून ठेवले होते. परंतु तरी सुध्दा त्यांना आदरांजली म्हणून एक छोंटीसी सभा संस्थेने आयोजित केली होती व त्या सभेला मी आणि सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे उपस्थित होतो. या सभागृहाच्या सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे या सुध्दा त्यांच्या शाळेच्या विद्यार्थिनी होत्या.

कै.मोहाडीकर हे मानधनासाठी कधीही नाही म्हणत नसे. ते मानधन आग्रहाने घेत असत. त्यांनी आयुष्यभरामध्ये जेवढे काही मानधन मिळवले होते त्या सर्व मानधनाच्या चेकवर त्यांनी आयुष्याच्या शेवटच्या दिवसामध्ये सह्या केल्या होत्या व ते सर्व चेक्स त्यांनी या ठिकाणी नावे घेतलेल्या संस्थांना दिले. मोहाडीकर सर साधारणत: दीड महिना आजारी होते. त्यांनी आयुष्यभरामध्ये जेवढे काही पैसे जमा केले होते ते सर्व पैसे ते संस्थांना देऊन गेले. साने गुरुजींसारखेच त्यागी जीवन कै.मोहाडीकरांचे होते. लहान मुलांना साने गुरुजींची दीक्षा देणारे नेतृत्त्व आज आपल्यातून हरपले. त्यांनी आचार्य अत्रे लिखित "शामची आई" या पुस्तकाच्या दीड वर्षात 1 लक्ष प्रती घरा-घरात पोहचविल्या होत्या. त्यांनी साने गुरुजींच्या 70 आठवणीच्या 35 हजार प्रती सुध्दा विकल्या होत्या. आईचे संस्कार मुलावंर असणे हे फार महत्वाचे असते. आता शामच्या आईचा रिमेक श्री. महेश मांजरेकर तयार करणार आहेत. आचार्य अत्रे यांनी "शामची आई" हा चित्रपट काढला होता व त्या चित्रपटामध्ये शामची आई जशी होती तशीच शामची आई आजच्या जमान्यात असणे गरजेचे आहे. शामच्या आईचा आता जो काही रिमेक्स तयार होणार आहे त्यामध्ये शामची आईच दिसली पाहिजे यासाठी दोन नावे पुढे आली होती व त्यामध्ये एक नाव नागपूरच्या अधिवेशनात गाजलेल्या विद्याताई बालन यांचे होते तर दुसरे नाव अमेरिका रिटर्न श्रीमती माधुरी दिक्षितचे यांचे होते. या दोन नावावर वर्तमानपत्रात बरीच चर्चा झाली होती. साने गुरुजींनी सांगितलेली व आचार्य अत्रे यांनी पडद्यावर आणलेली शामची आई असण्याची आज आवश्यकता आहे. "शामची आई" या पुस्तकाच्या एक लाख प्रती घराघरात पोहचविणारे सर आम्हाला हवे होते ते नसण्याची हळहळ या ठिकाणी व्यक्त करतो.

दादरची संस्कृती, मुलांचे आवडते सर आज आमच्यात नाहीत ही आम्हाला खंत आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आज परभणीच्या दोन सदस्यांना सभागृहाने श्रध्दांजली वाहिलेली आहे. कै. लक्ष्मणराव देशमुख यांना आम्ही पाहिलेही नव्हते परंतु त्यांनी स्वातंत्र्य मुक्ती लढयात फार मोठे कार्य केले होते.

कै. माणिकराव शंकरराव मस्के यांनी सुध्दा 1970 च्या काळात या सदनात काम केले होते. परभणीच्या दोन जुन्या जाणकारांचे निधन झाले त्यांना माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली वाहतो. धन्यवाद.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक ) : सन्माननीय सभापती महोदय, श्री. प्रीतमकुमार शेगावकरांचा परिचय नामांतरवादी चळवळीमध्ये झाला होता. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्यावेळेस त्यांनी झुंजार नेते म्हणून काम केले होते. एरवी ते मृदू, मितभाषी असत परंतु पँथरच्या मोर्च्यात ते आक्रमक असत. दलित पँथरची संघटना बांधण्यामध्ये माननीय रामदास आठवलेंच्या पाठोपाठ श्री. शेगावकरांचा मोठा वाटा होता. चळवळीमध्ये ते मोठया भावासारखे सर्वांशी वागत असत.

सभापती महोदय, श्री. प्रकाश मोहाडीकरांबरोबर माझा गेल्या 30 वर्षापासूनचा परिचय होता.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

साने गुरुजींना आमच्या पिढीने पाहिले नाही. साने गुरूजींचे मूर्तिमंत रूप म्हणजे श्री.प्रकाशभाई मोहाडीकर. त्यांनी साने गुरूजींचे व सेनापती बापट यांचे स्मारक दादर स्मशानभूमी येथे उभे केले. ते स्मारक उभे करून थांबले नाहीत. तर साने गुरूजींचे विचार स्मारक घरा घरामध्ये पोहचावे, श्यामची आई घराघरामध्ये पोहचावी, तो संस्कार सतत चालत रहावा, यासाठी त्यांनी प्रत्येक घरात पुस्तके पोहोचवली. श्यामची आई या पुस्तकाच्या लाखो प्रती त्यांनी घरा घरामध्ये पोहोचवल्या. तसेच, दुसऱ्या बाजूला साने गुरूजी कथा माला देखील सुरू केली. या कथा मालेने हजारो विद्यार्थी घडविले आहेत. साने गुरुजींनी धडपडणारी हजारो मुले उभी केली असे सांगितले जाते. त्यांच्या विचाराने धडपणारा सर्वात मोठा मुलगा म्हणजे श्री.प्रकाशभाई मोहाडीकर होते. साने गुरुजींचे कार्य अविरत पुढे चालू रहावे यासाठी ते अखंडपणे कार्यरत राहीले. श्री.प्रकाशभाई मोहाडीकर यांना कॅन्सर झाला होता. ते अंथरूणावर पडल्यानंतर देखील शेवटच्या क्षणा पर्यंत काम करीत होते.

श्री.प्रकाशभाई मोहाडीकर यांनी ग्यानबा रात्र विद्यालय उभे केले. साने गुरुजी विद्यालयाची कथा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांनी सांगितली आहेच. मुंबईतील घरगड्यांसाठी इयत्ता पहिली पासून ग्यानबा रात्र शाळा श्री.प्रकाशभाई मोहाडीकर यांनी सुरु केली. आम्ही रात्रशाळेतील मुलांचा पहिला मोर्चा काढला होता. तेव्हा पहिलीतील घरगडी असलेली मुले आली होती. त्यावेळी मुंबईतील लोकांना कळले की, पहिलीत शिकणाऱ्या मुलांना देखील दिवसा काम करावे लागते. अशा मुलांची सोय श्री.प्रकाशभाई मोहाडीकर करीत होते.

मी छात्रभारती चळवळीचा कार्यकर्ता आहे. आमच्याकडे चळवळीसाठी पैसा नसे. तेव्हा श्री.प्रकाशभाई मोहाडीकर म्हणत, आपण माझा हॉल घ्यावा. चहापाण्याची व्यवस्था मी करतो. आपण कार्यक्रम करावा. ते प्रत्येक गोष्टीमध्ये मुलांना पुढे जाण्यासाठी मदत करीत असत. श्री.प्रकाशभाई मोहाडीकर यांनी मुंबई शिक्षकांचे प्रतिनिधीत्व देखील केले. त्यांच्या नंतर 33 वर्षाने माझ्याकडे शिक्षक मतदार संघाचे प्रतिनिधीत्व आले. तेव्हा त्यांना खूप

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

आनंद झाला होता. माझ्या मागच्या निवडणुकीच्या वेळी ते स्वत: आले होते. यावेळी अंथरूणावर असताना देखील ते कार्यकर्त्यांना सांगत होते की, कपिलला मदत करा. श्री.प्रकाशभाई मोहाडीकर यांचा अशा प्रकारे माझ्यावर जीव होता. श्री.प्रकाशभाई मोहाडीकर यांच्या जाण्याने साने गुरूजींच्या चळवळीचे, विचारांचे फार मोठे नुकसान झाले आहे. त्यांची अखेर पर्यंत काम करण्याची वृत्ती ही सतत प्रेरणा देत राहील.

श्री.लक्ष्मणराव देशमुख हे स्वातंत्र्य सेनानी होते. मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये त्यांचे मोठे योगदान होते. तसेच श्री.माणिकराव मस्के यांचे सहकार चळवळीमध्ये मोठे योगदान होते. त्या सर्वांची मी आठवण काढतो आणि विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो. धन्यवाद.

............................

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री.अजित पवार यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे कार्यकर्ते श्री.प्रीतमकुमार शेगावकर, वि.प.स. तथा माजी मंत्री, साने गुरूजी विद्यालय तथा साने गुरूजी कथामालेचे मार्गदर्शक, श्री.प्रकाशभाई मोहाडीकर, सर्वश्री लक्ष्मणराव शंकरराव देशमुख, माणिकराव शंकरराव मस्के, माजी वि.प.स.यांच्या दु:खद निधना निमित्त शोक प्रस्ताव मांडला आहे. त्यावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

माझ्या अगोदर सन्माननीय सभागृहाचे नेते श्री.अजित पवार, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकरजी रावते, कपिल पाटील यांनी सविस्तरपणाने दु:ख व वेदना व्यक्त केली आहे.

श्री.प्रीतमकुमार शेगावकर यांनी मंत्री पदावर काम केलेले होते. ते शेवटपर्यंत पॅन्थर राहिले. माझ्या माहिती प्रमाणे आज पॅन्थरचा वर्धापन दिन आहे. अशा दिवशी आपण त्यांना विधान परिषदेच्या सभागृहामध्ये श्रद्धांजली अर्पण करीत आहोत, ही हृदयाला कायमची चटका लावणारी अशी बाब आहे. कोणतीही व्यक्ती एखाद्या पदा पर्यंत खूप मोठा संघर्ष करीत पोहोचते. त्यावेळी तिला वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणींना मात करून पुढे जावे लागते. तसा अनुभव अनेक लोकप्रतिनिधींना येत असतो. निवडून येणे, यश मिळविणे व टिकविणे हे महत्त्वाचे असते. समाजाच्या उपेक्षित, वंचित घटकामध्ये जन्माला आल्या नंतर त्यातून पुढे येणे हे कठीण असते. दारिद्र्य, अज्ञान व अनेक कारणांमुळे मनामध्ये असणारे वेगवेगळ्या प्रकारचे अंतर यासाठी संघर्ष करत श्री.प्रीतमकुमार शेगावकरांनी मराठवाड्याचे आणि महाराष्ट्राचे नेतृत्त्व केले. त्यांनी गावातील मुलांसाठी शैक्षणिक क्षेत्रात देखील काम केले.

मराठवाड्यामध्ये पॅन्थरची चळवळ उभी राहिली तेव्हा ग्रामीण भागामध्ये दलित महिलेने छापील साडी परिधान करणे किंवा चपला घालणे याला उघड-उघड विरोध होता. अशा काळामध्ये श्री.रामदासजी आठवले यांच्या नेतृत्त्वाखाली श्री.प्रीतमकुमार शेगावकरांनी काम केले. त्यानंतर त्यांचा निश्चितपणाने सन्मान झाला. ते काही काळ शासनामध्ये मंत्री म्हणून देखील काम करीत होते.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

त्याचप्रमाणे शिवशक्ती आणि भीमशक्तीच्या विचाराने एकत्र काम करीत असतांना, एकत्र वावरत असतांना त्यांना अनंत अडचणी येत होत्या. मागील अधिवेशनामध्ये गृह विभागाच्या संदर्भात त्यांनी सरकारकडे काही मुद्दे दिले होते. ॲड. प्रीतम शेगावकर यांच्या अकाली निधनामुळे दलित चळवळीचे, सामाजिक विकासाच्या चळवळीचे, मराठवाडयाच्या नेतृत्वाचे न भरुन येणारे नुकसान झाले आहे. त्यांनी या ठिकाणी जे विचार मांडले होते त्याप्रमाणे काम करण्याची सर्वांचीच बांधिलकी असली पाहिजे ही गोष्ट त्यांना अपेक्षित होती.

सभापती महोदय, कै. प्रकाश मोहाडीकर हे आमच्या साने गुरुजी विद्यालय या शाळेमध्ये इंग्रजी विषयाचे शिक्षक होते. त्यांनी आमचे इंग्रजीचे क्लासेस घेऊन आम्हाला शिकविले आहे. दादरच्या शिवाजी पार्क येथे असलेले साने गुरुजी विद्यालय जिला ग्यानबाची शाळा म्हणून ओळखले जाते त्या शाळेमध्ये इयत्ता तिसरी पासून इयत्ता नववीपर्यन्त जवळ जवळ सहा ते सात वर्षे त्या शाळेच्या इमारतीमधील एक विद्यार्थीनी म्हणून त्यांनी आमच्यावर संस्कार केले आहेत. हे संस्कार करीत असतांना "थेंबे थेंबे तळे साचे" या न्यायाने त्यांनी शाळेमधील प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घरामधील रद्दी विकून मिळणारे पैसे शाळेला देणगी म्हणून द्यावेत अशी एक योजना सुरु केली होती. शाळेमधील कनिष्ठ मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांवर संस्कार करीत असतांना चांद्यापासून बांध्यापर्यन्त "एक सूर, एक ताल", "जिंकू किंवा मरु" अशाप्रकारची गाणी त्यांनी हजारो विद्यार्थ्यांबरोबर बसून म्हटलेली आहेत. ज्यावेळी शिवाजी पार्कवर हजारो मुले एकत्र बसून एकच गीत सादर करतात त्यावेळी आपल्या अंत:करणातील देशभक्ती कशी जागृत होते याचा अनुभव मी स्वत: घेतला आहे.

मी स्वत: देखील काही काळ सानेगुरुजी कथामाला चालवीत होते. साने गुरुजींच्या गोष्टी वाचल्या आणि त्यामधील संस्कार पाहिले तर सर्व गोष्टींचा शेवट हा फार करुण करण्यात आलेला आहे. या गोष्टींमधील गोप्या किंवा मेरी असो किंवा सोनचाफ्याची गोष्ट असो त्यामधील शेवट कुणाच्या तरी मृत्यूने झालेला असतो. त्या मृत पावलेल्या व्यक्तीच्या आठवणीकरिता एक झाड लावले जाते. ते झाड वाढल्यानंतर पुढील पिढीशी संवाद साधते. या बाबत मी सरांना विचारले की, आपल्याला काहीतरी सकारात्मक भूमिका घेता यावी या करिता त्या गोष्टींचा शेवट आपल्याला वेगळया पध्दतीने करता येईल काय? सरांचे लक्ष सर्व ठिकाणी होते. ज्यावेळी माजी सदस्यांना विधिमंडळामध्ये बोलावून त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

त्यावेळी त्या कार्यक्रमाला मोहाडीकर सर उपस्थित राहिले होते. दोन वर्षापूर्वी अशाच एका कार्यक्रमाच्या निमित्ताने या इमारतीच्या पायऱ्या चढून येत असतांना मी सरांना विचारले की, "सर आपल्याला कुणाच्या तरी आधाराची गरज आहे काय?" त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, "मला आधाराची गरज नाही, मी माझ्या काठीच्या आधाराने चालू शकतो". वयाच्या नव्वदाव्या वर्षापर्यन्त काठीच्या आधाराने ते या विधिमंडळामधील कार्यक्रमांना उपस्थित राहिले होते. "जगाला प्रेम अर्पावे" ही त्यांच्या शाळेच्या वाटचालीमधील प्रार्थना आज देखील शाळेमध्ये म्हटली जाते. पीडित व दु:खी असलेल्या सर्वांची सेवा करण्याचे संस्कार

श्री. मोहाडीकर सरांनी आमच्यावर केले आहेत. साने गुरुजी कथामाला, साने गुरुजींचे वाङमयच्या रुपाने आपण समाजासाठी काही योगदान देऊ शकलो तर त्यामधून सरांचे विचार आपल्याला जास्त प्रभावीपणे पुढे नेता येतील असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. श्री. मोहाडीकर सर हे शिस्तीच्या बाबतीत अतिशय कडक असल्यामुळे वर्गामध्ये बडबड करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षा करण्यास ते मागेपुढे पहात नव्हते. साने गुरुजी विद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. भारतकुमार राऊत यांनी श्री. प्रकाश मोहाडीकर यांच्या नावाने एक टपाल तिकिट काढण्याची मागणी राज्यसभेमध्ये केली आहे. माझी सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, केंद्र शासनाने ते तिकिट काढण्याच्या संदर्भात राज्य शासनाने पाठपुरावा केला तर त्या निमित्ताने एका समाजसेवकाची आठवण कायम स्वरुपी आपल्या लक्षात राहील. मी साने गुरुजी विद्यालयाची माजी विद्यार्थीनी, शिवसेनेची विधान परिषद सदस्य या नात्याने ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर, श्री. प्रकाश मोहाडीकर, श्री. लक्ष्मणराव देशमुख व श्री. माणिकराव मस्के यांच्या दु:खद निधनाबद्दल श्रध्दांजली व्यक्त करते.

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत (रोजगार हमी योजना आणि जलसंधारण मंत्री) : सभापती महोदय. या सभागृहाचे नेते सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहाचे दिवंगत सदस्य ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर हे दलित, आंबेडकरी चळवळीचे थोर नेते होते. आमदार निवासामधील आपल्या कक्षामध्ये असतांना त्यांचे पहाटे दु:खद निधन झाले.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत . . . .

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर यांना औरंगाबाद येथील दलित पँथरमधील सर्व लोक "दादा" म्हणून संबोधित करीत असत. मला आठवते की, 1971-72 मध्ये जेव्हा राज्यात दलित पँथरची चळवळ वाढली, त्यानंतर श्री.नामदेव ढसाळ आणि श्री.राजा ढाले यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्व मंडळी काम करु लागलो. त्यावेळी ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर साहेब हे सरकारी सेवेमध्ये कार्यरत होते. परंतु त्यांनी आपली शासकीय सेवा झुगारुन स्वत:ला दलित पँथरच्या चळवळीमध्ये झोकून दिले. त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत प्रभावी होते. मात्र ते मृदूभाषी असले तरी सुध्दा त्यांचे नेतृत्व हे तेवढेच कणखर स्वरुपाचे होते. मला एक गोष्ट आठवते की, 14 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूर येथील दीक्षा भूमीवर झालेल्या धर्मांतर सोहोळ्यामध्ये एक भीम सैनिक म्हणून ते उपस्थित होते. एवढेच नव्हेतर परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पार्थिव देह एका ट्रकमध्ये ठेवण्यात आला होता, त्या वेळी सुध्दा ॲड.प्रीतमकुमार शेगावकर साहेब ट्रकमध्ये होते. तसेच ज्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मिलिंद महाविद्यालयाच्या निर्माण कार्यासाठी औरंगाबाद येथे जात असत, त्यावेळी तेथे ॲड.प्रीतमकुमार शेगांवकरदादा हे विद्यार्थी म्हणून शिकत होते आणि त्यावेळी ते सतत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सेवा करण्यासाठी हजर असत. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शना खाली त्यांनी अनेक ठिकाणी कामे केलेली आहेत.

सभापती महोदय, मला आठवते की, ते सातत्याने दलितांच्या प्रश्नांविषयी भांडत आले आहेत. एवढेच नव्हेतर मराठवाड्यातील ज्या-ज्या परिसरामध्ये दलितांवर अन्याय, अत्याचार झाला असेल तर त्यांच्यासाठी किंवा जे लोक दु:खामध्ये असतील किंवा कोणाला वेदना झाल्या असतील तर अशा वेळी त्यांनी लोकांच्या दु:खामध्ये सहभागी होण्याचे आणि त्याबाबत सातत्याने न्याय मागण्याचे काम केले आहे.नामांतर चळवळीमध्ये सुध्दा त्यांचे नेतृत्व अग्रणी राहिलेले आहे. ज्यावेळी ते दलित पँथरच्या चळवळी मध्ये कार्यरत होते, त्यावेळी मी देखील नागपूर येथील दलित पँथरच्या चळवळीमध्ये काम करीत होतो. त्यावेळी आम्ही रात्री मशाल पेटवून एक मोर्चा काढला होता. मग तेथे एक चळवळ निर्माण झाली होती. तेव्हा ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर हे मला स्वत:ला भेटावयास आले होते. त्यावेळी ते मला म्हणाले की, नितीन राऊत, आपण याबाबतीत फार चांगले काम केले आहे आणि तेव्हापासून माझी आणि त्यांची ओळख होती.

सभापती महोदय, आम्ही सर्वांनी मराठवाड्याच्या संदर्भातील आंदोलनामध्ये एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून काम केलेले आहे. त्यावेळी मी ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर यांना अत्यंत ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत . . . .

जवळून पाहिले आहे. तसेच मला त्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन देखील लाभलेले आहे. याठिकाणी असे सांगण्यात आले की, महाराष्ट्र राज्यामध्ये दलित पँथर संघटना निर्माण झाली. त्याबाबत सांगावयाचे तर सन्माननीय श्री.रामदास आठवले साहेबांचे नेतृत्व उभे करण्यासाठी ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर यांचा खऱ्या अर्थाने सहभाग आहे. कारण ते पूर्वीपासूनच दलित पँथर चळवळीमध्ये आणि महाराष्ट्रातील मराठवाडा येथील नामांतर आंदोलनामध्ये कार्यरत होते. तसेच ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर आणीबाणीच्या काळामध्ये तुरुंगामध्ये गेले होते. ते चांगल्या प्रकारचे काम करीत होते.

सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे की, या राज्याच्या विधी मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विधान मंडळातील दलित समाजातील अनुसूचित जातीच्या सन्माननीय सदस्यांचा फोरम निर्माण केला होता आणि त्याचे ते मार्गदर्शक होते, सर्वेसर्वा होते. त्यांनी सदरहू फोरमच्या माध्यमातून काही प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. मघाशी सन्माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी सांगितले की, ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांना सदनामध्ये शिक्षा जाहीर करण्यात आली, तेव्हा त्यांनी अतिशय पोटतिडकीने सर्वांना पत्रे पाठविली आणि सन्माननीय सदस्यांना पुन्हा सभागृहाच्या कामकाजामध्ये कसे सहभागी होता येईल यादृष्टीने प्रयत्न केला. अशा प्रकारे त्यांनी अनेक प्रश्न सदनामध्ये मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, मी याठिकाणी आवर्जून सांगू इच्छितो की, आपण ज्यावेळेला अनुसूचित जातीच्या संदर्भातील फोरमला सर्वमान्यता देऊ तेव्हाच या महान व्यक्तीमत्वाला खऱ्या अर्थाने श्रध्दांजली वाहिली असे होईल. ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर यांची शेवटची तशी इच्छा होती. त्यांना नेहमी असे वाटत असे की, ज्याप्रमाणे लोकसभेमध्ये तेथील अनुसूचित जातीच्या फोरमला जसा सन्मान मिळतो, तशा प्रकारे आपल्या राज्यातील अनुसूचित जातीच्या फोरमला देखील मिळाला पाहिजे आणि तसे झाले तर त्यांना हीच खरीखुरी श्रध्दांजली ठरेल. मी आज त्यांना मन:पूर्वक श्रध्दांजली अर्पण करतो, आदरांजली अर्पण करतो.

-----

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुध्दप्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर यांच्या रुपाने आपल्या राज्यात आंबेडकरी चळवळ रुजविणाऱ्या नेतृत्वास आपण मुकलेले आहोत. ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर हे दलित, अनुसूचित जाती, सर्वसामान्यवर्ग यांच्यासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे नेते होते. भारतीय दलित पॅंथर, रिपब्लीकन पक्ष यांचे ते संस्थापक सदस्य होते. या संस्था स्थापन करण्यासाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. आपल्या महाराष्ट्र विधानमंडळ अनुसूचित जाती फोरमचे ते उपाध्यक्ष होते. ते नेहमी सुटाबुटात राहात होते. मी एकदा त्यांना विचारले की, वकील साहेब, आपण नेहमी सुटाबुटात का राहता ? ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वारसा चालवित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जसे दिसत होते, जसे सुटाबुटात राहात होते त्याप्रमाणे ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर सुटाबुटात राहात होते. ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर यांच्याकडे पाहिल्यानंतर एक प्रकारचा जिव्हाळा वाटत होता, आपुलकी वाटत होती. त्यांना भेटल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाच भेटलो असे आम्हाला वाटत होते. अनुसूचित जाती फोरमच्या बैठकांना ते अर्धा तास अगोदर हजर राहात होते. अशा नेत्याला आपण गमावलेले आहे.

सभापती महोदय, श्री. प्रकाश मोहाडीकर हे गांधीवादी विचारसरणीचे होते. ते साने गुरुजींचे अनुयायी होते. मध्यंतरी त्यांच्या निधनाच्या अगोदर आमचे सरचिटणीस श्री. राजन भोसले यांनी आयोजन केल्यामुळे माननीय सभापती महोदयांबरोबर आम्ही श्री. प्रकाश मोहाडीकर यांच्या घरी गेलो होतो. ते मृत्यूशी झुंज देत होते. त्यांचा शेवटचा क्षण जवळ आला होता तरी सुध्दा माननीय सभापतींना साखर घालून थोडा चहा कसा देता येईल याकडे त्यांचे लक्ष होते. त्यांना बसण्यासाठी खुर्ची देत होते. शेवटपर्यंत त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता. त्यांची खोली एकदम छोटीशी होती. भांडी निटनेटकी लावलेली होती. पुस्तकांचे संपूर्ण आगार त्या ठिकाणी भरलेले होते. अशा नेत्याकडे आम्ही पंधरा दिवस अगोदर गेलो होतो. त्यांनाही मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

सभापती महोदय, श्री. लक्ष्मणराव देशमुख हे आमच्या काँग्रेस पक्षाचे बीड जिल्ह्याचे अध्यक्ष होते. हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये त्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. त्याचप्रमाणे श्री. माणिकराव मस्के हे खरेदी विक्री संघाचे चेअरमन होते. ते ज्येष्ठ समाजसेवक होते. अशा या सर्व दिवंगत सदस्यांना माझ्या पक्षाच्या वतीने मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आदरणीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी या ठिकाणी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सहजपणे या चारही दिवंगत सदस्यांच्या नावांवर नजर टाकली तर या सर्वांच्या बाबतीत एक समान धागा, समान सूत्र आपल्यासमोर आल्याशिवाय राहात नाही. यातील प्रत्येक व्यक्तिमत्व हे कोणत्या तरी संघर्षासाठी, कोणत्या तरी चळवळीसाठी, कोणत्या तरी सामाजिक परिवर्तनासाठी शेवटपर्यंत बांधिलकी न सोडणारे होते. अशी ही कर्तृत्ववान पिढी होती.

सभापती महोदय, ॲड. प्रीतकुमार शेगांवकर हे मागासवर्गीयांच्या चळवळीतील एक प्रमुख नेते होते. ते सातत्याने श्री. आठवले साहेबांची पाठराखण करीत होते. अशी एक म्हण आहे की, मोठ्या वटवृक्षाच्या सावलीत छोट्या झाडाची वाढ होताना कोठे तरी संकुचितपणा येतो. परंतु एकदा त्या चळवळीत असताना, त्या चळवळीतील नेत्याचे नेतृत्व मानल्यानंतर त्यांच्याबरोबर सावलीसारखे राहणे आणि त्यांच्या प्रत्येक आंदोलनात, त्यांच्या प्रत्येक महत्वाच्या परिवर्तनाच्या टप्प्यावर जेवढी साथ देता येणे शक्य असेल तेवढी साथ देणे ही एक प्रकारे आयुष्यभराची कमिटमेंट असते आणि अशा योद्धयांना ती कमिटमेंट पूर्ण करतानाच आपला देह ठेवावा लागतो. मला निश्चित कल्पना आहे की, ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर हे ज्या समाजातून आले, ज्या पध्दतीने त्यांना शिक्षणासाठी संघर्ष करावा लागला, ज्या पध्दतीने समाजातील विकृतीच्या विरोधात आवाज उठवावा लागला असेल ते काही साधे आणि सोपे काम नव्हते. सर्वांसाठी म्हणजे बहुजनांसाठी तो एक अप्रिय विषय असेल पण त्या परिवर्तनाकडे चालताना जी काही वाटचाल करावी लागते त्याप्रमाणे भक्कमपणे चालणारा एक चांगला सेनानी आपल्यातून गेलेला आहे.

सभापती महोदय, श्री. प्रकाशभाई मोहाडीकर हे पिढ्यान्‌पिढ्याचे गुरुजी होते. त्यांना केवळ मुंबईपुरते किंवा दादरपुरते सीमित करुन चालणार नाही. या महाराष्ट्रामध्ये स्वातंत्र्य आंदोलनापासून चळवळींची जी परिवर्तने घडत गेली आणि महात्मा गांधी असतील, साने गुरुजी असतील,

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/ पूर्वी श्री.बरवड 12:10

श्री.हेमंत टकले....

या सगळ्यांनी स्वातंत्र्य लढ्याबरोबर चांगल्या समाज निर्मितीची काही मूल्ये कायम रुजवित ठेवण्याचे काम केले होते. मग बाल मनावरील संस्कार असतील किंवा कुष्ठरोग्यांची सेवा असेल अशा विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्यांना आपल्यासाठी कायम एक मायेचे झाड आहे. आपण चांगले काम केले तर आपल्याला साथ मिळते, सोबत मिळते असे वाटत असते. खरे म्हणजे आजच्या या बदलत्या युगात 'श्यामची आई' या कल्पना आता विस्मृतीत गेल्या सारख्या आहेत. आई ही चिरकाल, चिरस्थायी असणारी प्रवृत्ती असते. आई असणे नव्हे तर आईची प्रवृत्ती जपणे हे अधिक महत्वाचे असते. ही शिकवण केवळ शाळेत देता येत नाही तर ती मैदानावरही देता येते. अमर हिंदच्या व्याख्यानमालेतून देता येते, गावोगावी दौरे करुन त्याचा प्रसार करता येतो. हे सर्व करीत असताना तुमचे अतिशय पारदर्शक चित्र समाजासमोर असणे आवश्यक असते. कारण समाजाला असे चित्र दाखविल्याशिवाय उमगत नाही. वास्तविक आपण कोणाचा आदर्श गिरवावा अशी आता शक्यता राहिलेली नाही. त्यामुळे अशा आदर्शवत असलेल्या व्यक्ती आपल्यातून जातात त्यावेळी सर्व समाजात कोठे तरी कमतरता आलेली आहे का याचा भास होण्याची सुरुवात होते.

त्याचप्रमाणे श्री.लक्ष्मणराव देशमुख व श्री.माणिकराव मस्के हे दोघेही मराठवाड्यातील होते. यापैकी श्री.लक्ष्मणराव देशमुख हे निजामशाहीच्या चळवळीतून आले होते. म्हणजे संघर्ष व संघर्षातून निर्मिती हा जो उपक्रम आहे, तो राबविणाऱ्या मोठ्या व्यक्ती या सभागृहाचे सदस्य होते. या दोघांनी समाजासाठी जे जे काम केले असेल, जो आदर्श निर्माण केला असेल तो आपल्यासमोर ठेवून आपण त्या मार्गावरुन जाण्याचा प्रयत्न करु या, अशा प्रकारे श्रध्दांजली वाहून मी येथेच थांबतो.

------

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अपूर्व हिरे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या सदनाचे नेते आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे. या शोक प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर हे दलित आंबेडकरी चळवळीतील एक मोठे नेते होते. त्यांच्या निधनामुळे सर्वांनाच दु:ख झालेले आहे.

सभापती महोदय, मी शिक्षक विभाग मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करीत आहे. शिक्षक चळवळीचे नेते श्री.प्रकाशभाई मोहाडीकर यांचेही दु:खद निधन झालेले आहे. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर एक संदेश दिला होता. शिक्षणाचा प्रसार कसा करता येईल, शिक्षकांना मोठे कसे करता येईल यासाठी ते सतत झटत होते. साने गुरुजींचे विचार जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी केले होते.

सभापती महोदय, या सदनाचे माजी सदस्य श्री.लक्ष्मणराव देशमुख आणि श्री.माणिकराव मस्के यांनी देखील आपल्या कार्याद्वारे या महाराष्ट्रात मोठे योगदान दिलेले आहे. या सर्वांना मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन माझे विचार येथेच थांबवितो.

--------

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

**सभापती** : या सदनाचे सन्माननीय नेते श्री.अजित दादा पवार यांनी जो दुखवटयाचा प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे. त्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सन्माननीय सदस्य ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर हे या सभागृहाचे सहा वर्षे सदस्य होते. प्रयत्नांची पराकाष्ठा करुन आपले प्रश्न सोडविणारे, दलित चळवळीतील एक कार्यकर्ते म्हणून मी अनेक वर्षे त्यांना पाहिलेले आहे. प्रश्न छोटा असो की मोठा त्या प्रश्नाचा पाठपुरावा करुन तो सोडविण्यासाठी जिद्दीचे प्रयत्न करणे आणि तो प्रश्न सुटल्यावर त्यासाठी मंत्री महोदयांनी मदत केली असेल किंवा अन्य कोणी मदत केली असेल त्या व्यक्तीकडे जाऊन अगदी खुलेपणाने आपल्या भावना व्यक्त करणे अशा प्रकारे त्यांच्या कामाची पध्दत असल्याचे मी या सदनात जवळजवळ 15 वर्षे पाहिलेले आहे.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर यांनी दक्षिण कोरिया, सिंगापूर व थायलंड येथील जागतिक धम्म परिषदेत सक्रिय सहभाग घेतला होता. आयुष्यभर त्यांनी दलित समाजाच्या विकासासाठी भरीव कार्य केले होते. कै.शेगांवकर हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निष्ठावंत सहकारी होते. आयुष्यभर त्या ध्येयवादाने प्रेरित होऊन दलित समाजाची सेवा करणे हेच आपले कर्तव्य आहे असे समजून त्यादृष्टीने ते सातत्याने काम करीत होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ D/ पूर्वी श्री. खंदारे 12:15

सभापती...

राज्य मंत्रिमंडळात सन 2006 ते 2009 या काळात गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधारणा, घर दुरुस्ती, पुनर्बांधणी, सामाजिक न्याय, खार जमीन व बंदरे इत्यादी खात्यांचे राज्यमंत्री म्हणून त्यांनी कार्य केले होते.

अशा एका दलित नेत्याचे गुरुवार दिनांक 21 जून 2012 रोजी दु:खद निधन झाले.

कै. प्रकाश गणेश मोहाडीकर हे एक अत्यंत विशाल व्यक्तिमत्व. या व्यक्तिमत्वाने सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात समाजापुढे ठेवलेल्या कामाचा विचार केला तर एक अत्यंत वंदनीय व्यक्तिमत्व म्हणून कै. प्रकाश मोहाडीकर यांच्याकडे पाहणे गरजेचे आहे. साने गुरुजींचे अनुयायी म्हणा किंवा साने गुरुजींचे सहकारी म्हणा, साने गुरुजींनी दिलेला संदेश, विचार आणि सामाजिक समतेची शिकवण या दृष्टीने त्यांनी आयुष्यभर काम केले. अत्यंत ध्येयवादी विद्यार्थ्यांची फळी तयार करण्यासाठी आपले सारे आयुष्य वेचताना मी त्यांना पाहिलेले आहे.

कै. मोहाडीकर यांच्या निधनाच्या दोन महिन्यापूर्वी माझे तरुण मित्र श्री. राजन भोसले यांच्यामुळे मला त्यांच्याकडे जाण्याची संधी मिळाली. किमान तास-दीडतास आम्ही चर्चा केली. त्यांनी राजकीय आणि सामाजिक बाबीवर चर्चा केली आणि आपले कार्य पुढे कसे चालू राहील यादृष्टीने त्यांनी त्यांच्या भावना आमच्या समोर व्यक्त केल्या. एका छोट्याशा खोलीमध्ये त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत वास्तव्य केले होते.

मला वाटते कै. मोहाडीकर यांनी आयुष्यभर केलेले काम, विशेषत: विद्यार्थी चळवळीमध्ये त्यांनी केलेले काम किंवा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी ज्या "शामची आई"चा उल्लेख केला, तशा प्रकारचे त्यांचे असलेले प्रखर विचार, या सर्व गोष्टी कशा जतन होतील यादृष्टीने आपण एखादा निर्णय घेऊ शकलो तर ती त्यांना ख-या अर्थाने श्रद्धांजली ठरु शकेल. दुर्दैवाने मोहाडीकर हे दिनांक 19 मे 2012 रोजी आपल्यातून गेलेले आहेत.

स्वर्गीय लक्ष्मणराव शंकरराव देशमुख यांच्या जन्म 2 मार्च 1926 रोजी बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे झाला. हैद्राबाद मुक्ती संग्रामात सक्रीय सहभाग घेणारा आणि शिक्षा भोगणारा काँग्रेसचा ध्येयवादी कार्यकर्ता असे हे व्यक्तिमत्व. ते बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. दोन वेळा ते महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन्माननीय सदस्य होते. सोमवार दिनांक 19 डिसेंबर 2011 रोजी त्यांचे दु:खद निधन झाले.

..2..

सभापती...

कै. माणिकराव शंकरराव मस्के यांचा जन्म 12 एप्रिल 1922 रोजी परभणी जिल्ह्यातील नवामोंढा येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए., बी.एड. पर्यंत झाले होते. त्यांनी परभणी जिल्हा सहकारी बँकेचे संचालक, जिल्हा खरेदी-विक्री संघाचे चेअरमन तसेच परभणी जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणूनही काम केले होते. कै. मस्के हे 1970 मध्ये परभणी-नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्थांद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा ज्येष्ठ समाजसेवकाचे बुधवार दिनांक 20 जून 2012 रोजी दु:खद निधन झाले.

सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयाकडे पाठविण्यात येईल.

--

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती......

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 10 जुलै, 2012 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 21 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 10 जुलै, 2012 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही